जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०५/२०२३
## दि.१३/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ३७४/२०२३,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | महादेव लिंगे, पोलीस उप निरीक्षक लोणीकंद पोलीस ठाणे,पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०५/२०२३ रोजी स.१०/३० वा.चे पुर्वी रोहन अभिलाषा सोसायटीजवळ मल्हारी डोंगराच्या पायथ्याशी तिवारी यांचे गट नंबर ५११ या मिळकतीकडे जाणा-या कच्च्या रोडवर, वाघोली, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना खबर मिळाली की, वर नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात कारणास्तव कोणत्या तरी धारधार हत्याराने इसम नामे गौरव सुरेश उदासी, वय ३२ वर्ष,रा.रामपुरी,कॅम्प,अमरावती सध्या रा. गणपती हौसिंग सोसायटी, तुकारामनगर, खराडी, पुणे याचे गळयावर वार करुन त्यास जिवे ठार मारले. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक श्री.पाटील मो.नं.८३०८१०८१८२ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ३१७/२०२३,भादविक ३९३,३४ |
| **फिर्यादी** | कृष्णा कदम वय २८ वर्षे रा.चाकण रोड हनुमानवाडी केळगाव पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०५/२३ रोजी १७/३०वा.चे दरम्यान उरुळी कांचन ते सोरतापवाडी चे दरम्यान सोलापुर पुणे महा मार्गावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे मित्र असे गाडीतुन जात असताना नमुद ठिकाणी एका पांढ-या रंगाचे चारचाकी गाडी चालकाने फिर्यादीचे गाडीला ओव्हरटेक करुन फिर्यादीस थांबण्याचा इशारा करुन फिर्यादीने गाडी थांबवल्यानंतर त्या गाडीमधील तीन इसम खाली उतरुन फिर्यादीच्या गाडीजवळ येवुन तुमच्या गाडीचे किती हप्ते थकले आहेत माहित आहे का आता तुमची गाडीच जमा करतो असे बोलुन जबरदस्तीने गाडीचे ड्रायव्हींग सीट वर बसुन गाडी पळवुन नेण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.गोरे मो.नं. ९६२३६४११०० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३१९/२०२३,भादविक ४५२,३२३,३२४,३५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७,५०४ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महा.पो.अधिनियम कलम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | अक्षय शिंदे वय ३४ वर्षे रा.येरवडा गावठाण पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०५/२०२३रोजी रात्री २३/३०वा.चे सुमा.घर नं.१२५ सिध्दार्थनगर लक्ष्मीबाई मोझे अपार्टमेंट येरवडा गावठाण पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नमुद ठिकाणी किराणा मालाचे दुकान असुन दुकाना समोरुन एक इसम हा बिअरची बाटली घेवुन जात असताना त्यास दुसरा एक इसम म्हणाला की,येथे थांबायाचे नाही असे म्हणुन दोघांमध्ये किरकोळ भांडणे झाली त्यानंतर त्यातील एक इसम हा फिर्यादी यांना म्हणाला की, त्याला दुकानासमोर थांबुन द्यायचे नाही. नाहीतर तुझे दुकान बंद कर असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्याने त्यांचे नातेवाईकांना बोलावुन घेवुन फिर्यादी यांना मारहाण करुन दुकानात अनाधिकाराने घुसुन दुकानातील सहित्याची नासधुस करुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.गुरव मो.नं. ९९२३८७३९९८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १२६ /२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ७० वर्षे, रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०५/२०२३ रोजी सायं.१६/००वा.चे सुमा.स्वारगेट येथे पी.एम.पी.एल.बस मध्ये चढताना पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणी बस मध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे हाता तील ८०,०००/- रू.कि.ची.सोन्याची पाटली ही कट करुन चोरुन नेली. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार तारु मो.नं.७७६९९५२२१८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २३७/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३९ वर्षे रा.इऑन आयटी पार्क जवळ, खराडी, |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०५/२०२३ रोजी सायं.१७/४५ वा.ते सायं.१९/१० वा.चे दरम्यान पी.एम.पी.एम.एल. बस पुणे मनपा तळेगाव ढमढेरे जाणारे बसमध्ये पुणे् स्टेशन ते जनक बाबा दर्गा बसस्टॉप दरम्यान खराडी पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणावरून पी.एम.पी.एम.एल.बसने प्रवास करीत असताना प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे गळयातील ३८,०००/- रू.कि.ची सोन्याची चैन चोरुन नेली. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार व्ही.बी. भोसले मो.नं.९९७५२०८७६८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**